## प्रेस नोट दिनांक ३१/०७/२०१९

## शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त होत असले बाबत

आम्ही भानुप्रताप शंकरराव बर्गे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर आज दि. ३१/०७/२०१९ रोजी ३४ वर्ष प्रदिर्घ सेवा करुन, शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त होत आहोत.

महाराष्ट्र पोलीस दलामध्ये आम्ही सन १९८५ ते २००६ पर्यंत मुंबई शहर, २००६ ते २०१४ पुणे शहर, २०१४ ते २०१८ दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य व २०१८ ते २०१९ पुणे शहर असे ३४ वर्ष महाराष्ट्र पोलीस दलामध्ये कर्तव्य बजावले आहे.

प्रत्येक ठिकाणी आम्हाला दिलेली जबाबदारी आम्ही अत्यंत मनापासून पार पाडलेली असून आतापर्यंत आम्ही खालील उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

- १९ कुप्रसिध्द गुंड/गुन्हेगार यांचा एन्काऊंटर त्यामध्ये प्रामुख्याने माया डोळस सह इतर ७ गुन्हेगाराचा लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथे खात्मा ( त्यावर शुट आऊट ॲट लोखंडवाला हा चित्रपट आधारीत आहे )
- एकाच वेळी २२० कि.ग्रॅ. ब्राऊन शुगर जप्त केली. ज्याची अंतरराष्ट्रीय बाजारात २२० कोटी किंमत.
- मुंब्रा, ठाणे येथून एकाच वेळी १५०० कि.ग्रॅ. RDX जप्त
- ४ खलीस्तानी अतिरेक्यांचा खात्मा तसेच भांडुप खिंडीपाडा, मुंबई येथे १६ तास चाललेल्या ऑपरेशन मध्ये ५ शिख दहशतवाद्यांचा खात्मा केला.
- अनेक गुन्हेगार, पाकिस्तानी ISI एजंट, दहशतवादी, व्हाईट कॉलर क्रिमीनल, मानवी तस्करी तसेच नक्सलवादी या सारख्या अनेक कुविख्यात/नामचिन गुन्हेगारांना अटक
- देह व्यापारामध्ये जबरदस्तीने अडकविण्यात आलेल्या १५० पेक्षा जास्त अल्पवयीन व सज्ञान पिडीत मुलींची सुटका

**वरील केलेल्या अतिउत्कृष्ठ कामगिरीमुळे राष्ट्रपती पदक देवून गौरविण्यात आले. तसेच भारतातील पहिले पोलीस अधिकारी ज्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर Survivors Club Membership हा सन्मान देवून गौरविण्यात आले आहे.**

आजपर्यंतच्या कालावधीमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आम्हाला ४३० पेक्षा जास्त बक्षिसे मिळाली असून ०१ शिक्षा देखील मिळालेली आहे.

केलेल्या कामाचे कौतुक हे वरिष्ठांसहीत पत्रकारांनी सुध्दा केल्याने, केलेल्या कामास तसेच आम्हास वेळोवेळी प्रसिध्दी मिळाल्याने जनमानसात आमची चांगली प्रतिमा तयार होण्यास मदत झाली. त्याबद्दल पत्रकारांचे विशेष आभार.

सदर सेवा कालावधीत आमचे, पोलीस दलामधील वरिष्ठ अधिकारी, सहकारी व कनिष्ठ सहकारी यांनी वेळोवेळी सहकार्य केले. तसेच राजकीय क्षेत्रातील पुढारी, औद्योगिक क्षेत्रातील नामवंत व्यक्ती, प्रतिष्ठित उद्योगपती, सर्व सामान्य नागरीक यांनी आमचेवर केलेल्या प्रेमाच्या ऋणांमध्ये सदैव राहू.